MHNS240019392019

## निशाणी क्र.७३ खालील आदेश

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज आदेश ६ नियम १७ प्रमाणे मुळ अर्जामध्ये दुरुस्ती करण्यासाठी केला आहे.

२. प्रतिवादी कथन करतात की, कैफियत कलम २२ मध्ये पहिल्या ओळीत यांचे शब्दाचे पुढे **"वडिल दि. १३/११/२०१५"** असे नजर चुकीने टंकलिखीत झाले आहे. सदरचे **"वडिल दि. १३/११/२०१५"** असे नमुद असलेले कमी करुन त्या ऐवजी "दि. **"१३/११/२००५"** असे शब्द नमुद करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दुरुस्तीकरीता दाखल करण्यात आला आहे.

३. वादी यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविली आहे. वादी यांनी कथन केले आहे की, सदर दावा चौकशीकामी आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

५. सदरील अर्ज निकाली काढणेकामी पुढील मुद्दे विचाराधीन निघतात, ते मुद्दे व त्यावरील निष्कर्ष पुढील कारणमिमांसावरुन देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १. | प्रस्तावित दुरुस्ती ही दोन्ही पक्षामधील वादातील खरा मुद्दा निराकरण करण्यासाठी आवश्यक आहे काय ? | ..होय. |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ बाबत –**

६. दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ चा उद्देश हा खटला गुणवत्तेनुसार चालविण्याकरिता व त्यातील खरा वाद निश्चित करण्यासाठी आवश्यक सर्व सुधारणा करण्याची परवानगी देते. परंतु, त्याद्वारे दुस–या पक्षावर कधीही अन्याय होवू नये.

७. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे कैफियतीच्या कलम २२ मधील दि. १३/११/२०१५ ही टंकलेखनाच्या नजरचूकीमुळे नमूद करण्यात आली आहे. वास्तविक सदर दिनांक १३/११/२००५ असा आहे. सदर तथ्याचे अनुषंगाने वादी यांनी कोणताही विशेष वाद उपस्थित केलेला नाही. वादी यांनी सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात बदल होत असले संदर्भात कोणतीही हरकत नोंदविली नाही. सदरची दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची असल्याने त्यामुळे मुळ अर्जाचे स्वरुपात कोणताही बदल

होतांना दिसून येत नाही. प्रस्तुत दुरुस्ती अर्ज मंजुर केल्यास मुळ अर्ज गुणदोषावर चालविण्यास सहाय्यकारी ठरणार असल्यामुळे अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देण्यात येत असून मुद्दा क्र. २ साठी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.** प्रस्तावित दुरुस्तीचा अर्ज नि.क्र.७३ मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादींनी प्रस्तावित दुरुस्ती विहीत मुदतीत करावी.

MADHUSUDAN DINKAR MAHADIK

Digitally signed by MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Date: 2026.01.28 16:09:54 +0530

**( मधुसूदन दिनकर महाडीक )**

दिनांक – २८.०१.२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सटाणा.